लोकसत्ता पु. पा. न. ४

# आरोपींच्या पोलीस कोठडीत दोन दिवसांची वाढ

## विरारमधील बलात्कार प्रकरण

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** विरारच्या पाचपायरी येथील जंगलात तरुणीवर बलात्कार करणाऱ्या दोन्ही आरोपींच्या पोलीस कोठडीत दोन दिवसांची वाढ करण्यात आली आहे. आरोपींविरोधात भक्कम पुरावे गोळा करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, या घटनेमुळे २०१९ मध्ये अशाच प्रकारे घडलेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणाच्या कटू आठवणींना उजाळा मिळाला आहे..

विरार पूर्वेच्या जीवदानी डोंगराजवळ पाचपायरी येथील जंगलात बुधवार, २२ मार्च रोजी मित्रासोबत फिरायला गेलेल्या २० वर्षीय तरुणीवर दोन तरुणांनी सामूहिक बलात्कार केला होता. यावेळी आरोपींनी विकृत कृत्य करत पीडित तरुणी आणि तिच्या मित्राचे चित्रीकरण केले होते. तसेच त्यांना नृत्य करायला भाग पाडले होते. पीडितेच्या मित्राचे कपडे काढून मारहाण केली होती. याप्रकरणी विरार पोलिसांनी राजेश सोनी आणि यश शिंदे या आरोपींना अटक केली आहे.

राजेश सोनी आणि यश शिंदे या आरोपींच्या पोलीस कोठडीची मुदत सोमवारी संपल्याने त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांच्या पोलीस कोठडीत आणखी दोन दिवसांची वाढ केली आहे. आरोपींविरोधात भक्कम पुरावे गोळा करण्यात येत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**चार वर्षांपूर्वीच्या घटनेची पुनरावृत्ती**

१५ एप्रिल २०१९ रोजी विरारमधील नववीत शिकणाऱ्या १५ वर्षीय शाळकरी मुलीवर तिच्याच मित्रासमोर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. ही पीडित मुलगी विरार पूर्वेला आपल्या नातेवाईकाकडे आपल्या मित्रासोबत जात होती. जीवदानी रोड येथील भास्कर वामन ठाकूर शाळेच्या मागून ते दोघे जात असताना दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना हटकले. त्यांनी पीडित मुलीच्या मित्राला मारहाण केली आणि त्यांना तेथील निर्जन जागेत नेले. यानंतर त्यांनी मित्रासमक्षच मुलीवर बलात्कार केला होता. या प्रकरणातील एक आरोपी रिक्षाचालक होता. दोन्ही आरोपींना नंतर अटक केली होती. दरम्यान, अशाच घटनेची पुनरावृत्ती आता झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

Scanned with CamScanner

पुण्य नगरी पु. पा. न. ४

# चालक, पोलीस शिपाई भरतीसाठी लेखी परीक्षा पडली पार

**मीरा रोड ।** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यालयामध्ये चालक व पोलीस शिपाई भरतीसाठी लेखी परीक्षा रविवारी पार पडली. या परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या १०४ चालक उमेदवारांपैकी ९९ उमेदवार हजर होते. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत सुरू असलेल्या पोलीस शिपाई व चालक पदाच्या प्रक्रियेमध्ये शारीरिक चाचणी व कौशल्य चाचणीमधून लेखी परीक्षेसाठी १२,१२४ उमेदवार पोलीस शिपाई लेखीसाठी पात्र असून १०४ उमेदवार चालक पदाच्या लेखी परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.

रविवारी सकाळी ८.३० ते १० या वेळेत ही लेखी परीक्षा घेण्यात आली आहे. आयुक्तालयाकडून पोलीस चालक भरती लेखी परीक्षा पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी सर्व स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. लेखी परीक्षा ही व्हेरिफिकेशन, बायोमेट्रिक, फ्रीस्किंग, सीसीटीव्ही, व्हिडीओग्राफी, उचित बंदोबस्तासह पारदर्शकपणे घेण्यात आली असल्याची माहिती पोलीस आयुक्तालयाकडून देण्यात आली. लेखी परीक्षेच्या पोलीस बंदोबस्तासाठी वरिष्ठ अधिकारी तसेच ७ पोलीस निरीक्षक, २२ सहाय्यक पोलीस निरीक्षक, ४२ पोलीस अंमलदार हे कर्तव्यावर हजर होते.

पुण्य नगरी पु. पा. न. ४

# जिल्हास्तरीय एकपात्री अभिनय स्पर्धा

**नालासोपारा ।** यंगस्टार ट्रस्ट अध्यक्ष हितेंद्र ठाकूर आयोजित कै. रमाकांत वाघचौडे स्मृतीप्रित्यर्थ चांगभलं चषक पालघर जिल्हास्तरीय एकपात्री अभिनय स्पर्धा ९ एप्रिल रोजी बहुजन विकास आघाडी भवन, चौथा रस्ता, श्रीप्रस्थ, नालासोपारा-पश्चिम येथे होणार आहे. या स्पर्धेत प्रथम बक्षीस दहा हजार एक रुपये, स्मृतिचिन्ह - द्वितीय बक्षीस सात हजार एक रुपये, स्मृतिचिन्ह - तृतीय बक्षीस पाच हजार एक रुपये, स्मृतिचिन्ह दिले जाणार आहे.

लोकमत पु. पा. न. २

# सरकारकडून विरोधकांवर दडपशाही - मुझफ्फर हुसेन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** देशात बहुमताच्या जोरावर केंद्र सरकारने लोकशाहीची मूल्ये पायदळी तुडवून हुकूमशाही चालवली आहे. महागाई, बेरोजगारी, गुन्हेगारी वाढली असताना त्याबद्दल मूग गिळून असलेले सरकारविरोधी पक्षांचा आवाज दाबत असल्याने लोकशाही धोक्यात आली आहे, अशी टीका काँग्रेस नेते मुझफ्फर हुसेन यांनी केली.

राहुल गांधी यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द केल्याने भाईंदरच्या नवघर नाक्यावर स्वातंत्र्यसैनिक स्मारकाजवळ काँग्रेसच्या वतीने भाजप सरकारच्या निषेधार्थ सत्याग्रह आंदोलन रविवारी केले. काँग्रेसच्या आंदोलनात महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे माजी उपमहापौर प्रवीण पाटील, माजी गटनेत्या नीलम ढवण, लक्ष्मण जंगम, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश पदाधिकारी आसिफ शेख सहभागी झाले होते. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत, माजी गटनेते अनिल सावंत व जुबेर इनामदार, माजी नगरसेवक राजीव मेहरा, गीता परदेशी, अशरफ शेख, फरीद कुरेशी, महेंद्र सिंह, प्रकाश नागणे उपस्थित होते. महागाई, बेरोजगारी वाढली आहे, त्याबद्दल काहीही न करता फक्त दोन उद्योगपतींच्या इशाऱ्यावर देश चालवला जात आहे, असा हल्लाबोल हुसेन यांनी केला.

## 'आता जनतेनेच उठाव करावा'

जो प्रश्न उपस्थित करतो त्याच्या मागे ईडी, इन्कमटॅक्स, सीबीआय, निवडणूक आयोग सारख्या संविधानिक संस्था लावून विरोधी पक्षांना टार्गेट केले जाते. आगामी निवडणुकीत जागा दाखविण्यासाठी जनतेनेच उठाव करावा, असे आवाहन यावेळी मुझफ्फर यांनी केले.

लोकमत पु. पा. न. १

# ऑनलाइन नोकरी शोधणे महिलेला पडले महागात

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडच्या शांतीनगरमध्ये राहणाऱ्या स्वप्नाली कुमारनंदन या ऑनलाइन नोकरी शोधत असताना टास्क करून नफा देण्याच्या बहाण्याने त्यांची फसवणूक करण्यात आली.

स्वप्नाली इंटरनेटवर नोकरी शोधत असताना टॅलेंट प्रो कंपनी नावाने टास्क पूर्ण करून घरबसल्या २ ते ३ हजार रूपये दररोज कमवू शकता, असा संदेशासह एक लिंक पाठवण्यात आली. लिंकद्वारे त्यांनी टास्क पूर्ण केला असता त्यांना २१० रुपये मिळाले. त्यांनी संबंधित समी नावाच्या महिलेशी संपर्क केला असता दररोज २५ टास्क पूर्ण केले, तर दोन हजार ७७७ रुपये मिळतील. पुढील टास्क पूर्ण करायचे असतील तर तुम्हाला पैसे भरावे लागतील, असे समी हिने सांगितले.

नफ्याच्या आमिषाने स्वप्नाली यांनी १ लाख ८१ हजार भरले व टास्क पूर्ण केल्याने नफा म्हणून ३७ हजार ६७४ रुपये परत मिळाले. त्यानंतर पैसे न मिळाल्याने अन्य काही जणांकडे चौकशी केली असता त्यांचीही फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी नयानगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यावर समीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner

Scanned with CamScanner

पुण्य नगरी पु. पा. नं. १

# ऑनलाइन खरेदी करताना वृद्धेची आठ लाखांची फसवणूक

**मीरा रोड।** मीरा रोड येथील हटकेश परिसरात राहणाऱ्या चारुबाला आनंद खरे या ७० वर्षीय महिलेची ऑनलाइन खरेदी करताना आठ लाखांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चारुबाला आनंद खरे या रितू पॅराडाईज, जी.सी.सी. क्लब जवळ, मीरा रोड पूर्व येथे एकट्या राहत असून त्या ऑल इंडिया रेडिओमधून कार्यक्रम अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झाल्या आहेत. सेवानिवृत्त झाल्यानंतर मिळालेली रक्कम त्यांनी बँकेत ठेवली होती. चारुबाला खरे यांनी ऑनलाइन ६ टॉवेलचे पॅकेट खरेदी केले. त्याचे ११६९ रुपये गुगल पे वरून पाठवले. त्याचवेळी त्यांच्या बँकेच्या खात्यातून ११६९ ऐवजी १९००५ रुपये वळते झाले. त्यानंतर त्यांनी बँकेला ऑनलाइन तक्रार केली. तक्रार केल्यानंतर त्यांच्या मोबाइलवर अनोळखी व्यक्तीचा फोन आला. त्यावेळी त्या व्यक्तीने बँकेतून बोलत असल्याचे सांगून तुमचे पैसे परत करतो त्यासाठी एक ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर ॲप डाऊनलोड केल्यानंतर त्यांच्या एका बँक खात्यातून १ लाख रुपये गेल्याचा मेसेज आला. त्यानंतर त्यांच्या वेगवेगळ्या बँक खात्यांतून ८,२९,०१५ रुपये दुसऱ्या खात्यात गेल्याचे समजले. त्यानंतर खरे यांनी खात्यातून पैसे गेल्याचे सायबर गुन्हे शाखेकडे तक्रार केली. सायबर गुन्हे शाखा, मीरा रोड यांनी तपास करून वेगवेगळ्या बँक खात्यांतून ८,२९,०१५ रुपये हे अनोळखी व्यक्ती दाऊद मसुद (रा. मक्सुडिया अम्वारी, अजमगड, उत्तर प्रदेश) याच्या खात्यावर गेल्याचे सांगितले. त्यानंतर त्या अनोळखी व्यक्तीविरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात बँकेतून बोलत असल्याचे खोटे सांगून फसवणूक केल्यामुळे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुण्य नगरी पु. पा. नं. ४

# विरारमध्ये 'वंचित आघाडीची' सभासद नोंदणी

**नालासोपारा।** वंचित बहुजन आघाडीला भारतातील राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळाल्याला ४ वर्षे झाली. त्यानिमित्त वंचित बहुजन आघाडीच्या महिला आघाडी अध्यक्षा वसई विरार महानगरपालिका क्षेत्र गीता जाधव यांनी विरार स्टेशन रोड-पूर्व येथे वंचित बहुजन आघाडी सभासद नोंदणी अभियान राबवले. सर्व आंबेडकरवादी ॲड. प्रकाश आंबेडकर यांना मानणाऱ्या बहुसंख्य वर्गाने स्वतःहून या सभासद नोंदणीत भाग घेऊन सर्वांनी मोलाचे सहकार्य केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विरार शहर महिला आघाडी मनवेल पाडा विभाग वंचित बहुजन आघाडी पालघर प्रभारी सुप्रेश खैरे, सुधाकर इंगळे, अक्षय गुजर, संतोष कवडे, रेश्मा कहार, प्रेरणा भेकरे, स्मिता मनोहर, साक्षी जाधव, सारिका सकपाळ, राधिका संसारे, उमेश कदम, विशाल खैरे, सुविध पवार यांनी अथक परिश्रम घेतले.



महाराष्ट्र टाइम्स पा. न. ५

# 'हिंमत असेल तर बाहेर पडा'

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आघाडी सोडण्याचे उद्धव ठाकरे यांना आव्हान

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

'तुम्हाला स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे हिंदुत्व मान्य असेल तर तेवढी हिंमत दाखवा आणि सत्ता, खुर्चीसाठी ज्या महाविकास आघाडीसोबत गेलात तेथून बाहेर पडा', असे आव्हान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी उद्धव ठाकरे यांना नाव न घेता दिले. 'आज बाळासाहेब असते तर सावरकरांचा अपमान करणाऱ्यांना जोडे मारले असते. शिवाय असा अपमान निमूटपणे सहन करणाऱ्यांनाही जोडे हाणले असते', असा टोलाही त्यांनी लगावला.

उद्धव ठाकरे यांनी रविवारी मालेगावच्या सभेत बोलताना, 'स्वातंत्र्यवीर सावरकर हे आमचे दैवत आहे, त्यांचा अपमान आम्ही सहन करणार नाही', असे काँग्रेस नेते राहुल गांधी यांना ठणकावून सांगितले होते. यावरून शिंदे यांनी उद्धव यांना लक्ष्य केले. तसेच राहुल यांच्यावरही जोरदार टीका केली.

'सावरकरांचा अपमान होत असताना विधिमंडळ अधिवेशनात स्वतःला हिंदुत्ववादी म्हणणारे नेते, आमदारांनी राहुल गांधींच्या विरोधात एकही शब्द काढण्याची हिंमत दाखवली नाही. केवळ राजकारणासाठी, आघाडीसाठी ते मूग गिळून बसले होते. राहुल यांची खासदारकी नियमानुसार रद्द झाली असताना काळ्याफिती लावून त्यांचा बचाव करण्यात आला. त्यामुळे अपमान सहन करणार नाही म्हणजे काय करणार', असा प्रश्न शिंदे यांनी ठाकरे यांना केला. 'अपमान सहन करणार नाही' हे विधान म्हणजे उशिरा सुचलेले शहाणपण आहे. बोलून काही होणार नाही, तुमची भूमिका कृतीतून दिसली पाहिजे', असेही ते म्हणाले.



- स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे हिंदुत्व मान्य असेल तर तेवढी हिंमत दाखवा
- बाळासाहेब असते तर सावरकरांचा अपमान करणाऱ्यांना जोडे मारले असते.
- शिवाय असा अपमान निमूटपणे सहन करणाऱ्यांनाही जोडे हाणले असते

### सावरकर गौरव यात्रेची घोषणा

राहुल यांनी त्यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द झाल्यानंतर, 'माफी मागायला मी सावरकर नाही, माझे नाव गांधी आहे', असे विधान केले होते. या पार्श्वभूमीवर शिवसेना-भाजप युतीने उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला कोंडीत पकडण्याची रणनीती आखली आहे. त्यानुसार सावरकरांचे कार्य पुन्हा समाजासमोर आणण्यासाठी राज्यभरात सावरकर यात्रा काढण्याची घोषणा शिंदे यांनी पत्रकार परिषद घेऊन केली.

'राहुल गांधी सावरकरांचा जाणीवपूर्वक अपमान करतात. वीर सावरकर यांचा अपमान करणाऱ्या मणिशंकर अय्यर यांच्या पुतळ्याला बाळासाहेब ठाकरे यांनी जोडे मारले होते. कालच्या सभेत सावरकरांचा अपमान सहन करणार नाही म्हणणारे अशी हिंमत दाखवणार का, राहुल गांधी यांच्या पुतळ्याला थोबाडीत लगावणार का', असे प्रश्न शिंदे यांनी विचारले.

'राहुल यांच्या कृत्याचा आणि वृत्तीचा निषेध करावा तेवढा कमीच आहे. सावरकर होण्याची तुमची लायकीदेखील नाही. सावरकरांचा त्याग तुमच्यामध्ये नाही, मग तुम्ही सावरकर कसे काय होऊ शकता? सावरकर व्हायला त्याग आणि देशाबद्दल प्रेम असावे लागते. तुम्ही तर परदेशात जाऊन आपल्या देशाची निंदा करता. यापेक्षा या देशाचे दुसरे दुर्दैव काय असू शकते. अशी निंदा करणे हा एकप्रकारे देशद्रोहच आहे', असे शिंदे यांनी सुनावले. सावरकरांनी देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनासह अनेक क्षेत्रांत अत्यंत मोलाचे योगदान दिले. जाती निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन, मराठी भाषेचा गौरव, मराठी भाषेला अनेक शब्द देण्याचे काम त्यांनी केले. प्रत्येक देशवासी त्यांच्या अतुलनीय योगदानाचा ऋणी आहे. संपूर्ण देश आणि विशेषतः महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीच विसरू शकणार नाही', असे शिंदे म्हणाले.

दरम्यान, 'सत्तेला लाथ मारण्याची यांची हिंमत नाही. सावरकर त्यांच्या कृतीत राहणार नाहीत वा दिसणार नाहीत. यांच्या केवळ भाषणात सावरकर जिवंत राहतील' असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी लगावला.

CamScanner

Scanned with CamScanner

लोकमत पा. नं. ४

## रेतीचोरांवर कारवाई

नालासोपारा : वैतरणा खाडीकिनारी दहा ब्रास रेती जप्त करण्यात मांडवी पोलिसांना यश आले आहे. वैतरणा खाडीकिनारी रेल्वे पुलाच्या परिसरात अवैधरीत्या रेती उत्खननास कायद्याने बंदी असताना रेल्वे पूल क्र.९२ जवळ शनिवारी संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास आरोपी सागर ज्ञानेश्वर पाटील व राकेश मेहेर यांनी ५० हजार रुपये किमतीची दहा ब्रास रेती अवैधरीत्या उत्खनन व विक्रीसाठी साठा करून ठेवली होती. मांडवी पोलिसांनी कारवाई करून दोन जणांविरुद्ध रविवारी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पा. नं. ४

## पैशांचे आमिष दाखवून गंडा

नालासोपारा : पैशांचे आमिष दाखवून अर्नाळा येथे एकाची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली आहे. अर्नाळा जुना कोळीवाडा येथील चेतन राजेंद्र पाटील (४५) यांची २६ डिसेंबर २०२२ ते २१ जानेवारी २०२३ दरम्यान आरोपींनी मोबाइलवर संपर्क साधत ऑनलाइन पैसे गुंतवल्यास आर्थिक फायदा मिळेल, असे आमिष दाखवून वेगवेगळ्या लिंक व साइट पाठवून त्यांचा विश्वास संपादन केला होता. त्यानंतर त्यांच्या बँक खात्यातून २ लाख ७५ हजार ९९० रुपये ऑनलाइन घेऊन फसवणूक करण्यात आली. रविवारी अर्नाळा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

सामना पा. नं. ५

## गांजा जप्त

नालासोपारा : पोस्ट ऑफिस नाका येथे आरोपी अल्बर्ट ब्राह्मणीया (३५) याच्याकडून १० हजारांचा गांजा पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

सामना पा. नं. १

# विरोधकांचा 'काळा सोमवार'

## संसदेत काळे कपडे, काळे फलक

नवी दिल्ली, दि. २७ (विशेष प्रतिनिधी)- राहुल गांधी यांनी माफी मागावी आणि अदानी प्रकरणाची संयुक्त संसदीय समितीमार्फत चौकशी करावी, या दोन मागण्यांवरून संसदेचे कामकाज ठप्प असताना राहुल गांधी यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द करण्याचा निर्णय आल्यानंतर विरोधक कमालीचे आक्रमक झाले आहेत. त्याचे तीव्र पडसाद आज संसद भवनात पहायला मिळाले. काँग्रेस खासदारांनी काळे कपडे घालून सरकारच्या दडपशाहीचा निषेध केला. सोनिया गांधी आज संसदेत काळ्या रंगाची साडी घालून आल्या आणि संसद भवनाबाहेर महात्मा गांधींच्या पुतळ्याजवळ झालेल्या आंदोलनाचे नेतृत्वही त्यांनी केले. ▮ पान ६



*लोकसभेत विरोधक इतके आक्रमक होते की सभापतींच्या आसनासमोर जात काळे कपडे फडकवण्यात आले. तसेच निषेधाचे काळे फलकही दाखवण्यात आले. गदारोळामुळे लोकसभेचे कामकाज सभापतींनी दुपारी चार वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केले.*

राहुल गांधी यांना सरकारी बंगला सोडावा लागणार / पान ६

सामना पा. नं. ५

## तस्करांना अटक

वसई - नालासोपाऱ्यात तुळींज पोलिसांनी गस्तीदरम्यान लाखो रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. याप्रकरणी दोन नायजेरियन ड्रग्स तस्करांना अटक केली. याबो हमीद रेमंड व इझे मायकल चुकुमा अशी त्यांची नावे असून त्यांच्याकडून एमडी ड्रग्स, कोकेन व गांजा जप्त केला.

CS CamScanner

Scanned with CamScanner

पुढारी पा. नं. ३


# पर्ससीन नेट, एलईडीद्वारे अवैध मासेमारीचा उच्छाद

## पारंपरिक मच्छीमारांवर संकट, मच्छीमार कृती समितीची कारवाईची मागणी

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील सागरी मासेमारी क्षेत्रात पर्ससीन नेट व एलईडीद्वारे मोठ्याप्रमाणात अवैध मासेमारी केली जात आहे. त्यात मालवण जिल्ह्यातील मालवण, वेंगुर्ला, देवगड बंदरांमध्ये तर या अवैध मासेमारीने उच्छाद मांडल्याने स्थानिक मच्छिमारांवर उपासमारीची वेळ आली आहे. या अवैध मासेमारीवर कारवाई करण्याची मागणी अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीने मत्स्यविभागाकडे केली आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाने हि कारवाई स्थानिक पोलीस, भारतीय नौदल व तटरक्षक दलामार्फत संयुक्तपणे करावी. या कारवाईत पारंपारीक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या स्थानिक मच्छिमारांना देखील सामावून घेण्याची मागणी समितीने केली आहे. राज्यातील पश्चिम किनारपट्टीपासून १२ नॉटिकल मैल अंतरापर्यंत येथील मच्छिमारांना मासेमारी करता येते. त्यातील संशयित बोटींवर कारवाई करण्याचा अधिकार तटरक्षक व नौदलाला आहे. तर स्थानिक पोलिसांना किनाऱ्यापासून ५ नॉटिकल मैल पर्यंत कारवाईचा अधिकार आहे. पण हि कारवाई संयुक्तपणे केल्यास पारंपारीक मच्छिमारांना दिलासा मिळेल, अनेकदा समुद्रात वादळे येतात. त्यातच तेल सर्वेक्षणासाठी सर्वेक्षण क्षेत्रापासून सुमारे १० नॉटिकल मैल परीघात मासेमारीला बंदी घातली जाते. यामुळे पारंपारीक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांवर मासळी दुष्काळाचे संकट ओढवते. त्यातच पर्ससीन नेट व एलईडी द्वारे अवैध मासेमारी करणाऱ्यांनी उच्छाद मांडल्याने स्थानिक मच्छिमारांवर उपासमारीची वेळ येत आहे. कारण पर्ससीन नेटद्वारे मासेमारी करणाऱ्यांची जाळी मोठी असल्याने त्यात मासळीसह त्यांची पिल्ले देखील सापडतात. तसेच एलईडीद्वारे मासेमारी करणाऱ्या बोटींवर मोठ्याप्रमाणात जास्त पॉवरचे एलईडी बल्ब लावले जातात. या बल्बकडे अधिकाधिक मासळी आकर्षित होत असल्याने या अवैध मासेमारी करणाऱ्यांच्या जाळ्यात मोठ्याप्रमाणात मासळी सापडते. यात त्यांच्या मासेमारीचा खर्च जास्त तर मासळी कमी असे संकट ओढवत आहे. त्यामुळे राज्याच्या हद्दीतील १२ नॉटिकल मैल क्षेत्रात पर्ससीन नेट व एलईडी द्वारे अवैध मासेमारी करणाऱ्यांवर ठोस कारवाई करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी समितीने केली आहे. मत्स्यव्यवसाय विभागाने ५ फेब्रुवारी रोजी जारी केलेल्या पर्ससीन नेट मासेमारी कायद्यांतर्गत पर्ससीन मासेमारीला जानेवारी ते ऑगस्टपर्यंत बंदी घालण्यात आली आहे. असे असतानाही बेकायदेशीरपणे मासेमारी सुरु आहे. या अवैध आळा घालण्यासाठी जिल्हातील सर्व बंदरावर कारवाई करण्यासाठी स्थानिक पोलीस व स्थानिक पारंपारीक मच्छीमारांना सोबत घ्यावे, अशी सूचना समितीने केली आहे.




### अवैध मासेमारी करणाऱ्या बोटीचे परवाने रद्द

महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत कारवाई करताना भादंविसं मधील कलम १२२ अंतर्गत पोलिसांना संशयित व्यक्तीवर कारवाई करण्याचा अधिकार आहे. मुंबईमध्ये २६/११ चा अतिरेकी हल्ला सागरी मार्गानेच झाला होता. त्यानंतर सागरी सुरक्षा बळकट करण्यासाठी अनेक उपाययोजना गृह विभागाकडून करण्यात येत आहेत. नाकाबंदी करून वाहनांचे लायसेन्स (परवाने) तपासून अवैध वाहनांवर कारवाई करण्याचे प्रयोजन केले जात आहे. त्याच धर्तीवर मासेमारी जिल्ह्यातील अवैध मासेमारी टाळण्यासाठी व सागरी सुरक्षा अधिकाधिक बळकट करण्यासाठी पोलीसांनी अवैध मासेमारी करणाऱ्या बोटीचे परवाने रद्द करावेत. त्यांच्या बोटीतील साहीत्य तपासावे. त्यात जर ते दोषी आढळल्यास त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी समितीने केली आहे.

Scanned with CamScanner

महाराष्ट्र टाइम्स पु. पा. नं. १

# कारशेडसाठी मे महिन्यात निविदा

## मिरा–भाईंदरच्या राईमध्ये स्थानिकांच्या विरोधानंतर उत्तनमधील जागेचा पर्याय

- मुख्यमंत्र्यांच्या तत्वतः मंजुरीनंतर प्रक्रिया
- उत्तनमधील जागेचे सर्वेक्षण पूर्ण
- राई ग्रामस्थांना दिलासा

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदरच्या राई गावात प्रस्तावित मेट्रो कारशेडच्या कामात स्थानिकांच्या शेतजमिनी व घरे बाधित होणार असल्याने तिथे कारशेड उभारण्यास ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे. या पार्श्वभूमीवर, उत्तन येथील पर्यायी सरकारी जमिनीवर कारशेड उभारण्यास मुख्यमंत्र्यांनी तत्वतः मंजुरी दिली आहे, असे समजते. त्यानुसार तेथे कारशेड उभारण्यासाठी एमआरडीएमार्फत मे महिन्यात निविदा प्रक्रिया राबवण्यास सुरुवात केली जाणार आहे, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. यासाठी नुकतेच येथील जागेचे सर्वेक्षणदेखील करण्यात आले आहे.

मिरा-भाईंदर दहिसर मेट्रो९ व छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ-अंधेरी मेट्रो ७अ प्रकल्पासाठी कारशेड उभारण्याच्या दृष्टीने एमएमआरडीएकडून मिरा-भाईंदर महापालिका हद्दीत येणाऱ्या राई गावातील ३२ हेक्टर जमीन आरक्षित करण्यात आली आहे. या प्रस्तावित प्रकल्पामुळे स्थानिक ग्रामस्थांच्या शेतजमिनी व सुमारे १५० हून अधिक जुनी घरे बाधित होणार आहेत. त्यामुळे येथील जमीन हस्तांतरित करण्यास ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे. हा प्रकल्प उत्तनमधील सरकारी जमिनीवर स्थलांतरित करण्याची मागणी होत आहे.

हा मुद्दा आमदार प्रताप सरनाईक यांनी विधिमंडळातही उपस्थित केला होता. यासह ग्रामस्थांनी सुचवल्याप्रमाणे, उत्तनच्या खोपरा येथील सरकारी जमिनीवर कारशेड उभारण्याचा प्रस्ताव सादर केला होता. त्यावर हिवाळी अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राई येथील प्रस्तावित कारशेड प्रकल्प उत्तनला स्थलांतरित करण्यास तत्वतः मंजुरी दिल्याचे सरनाईक यांनी सांगितले होते. त्यानंतर नुकतेच उत्तनमधील सरकारी जमिनीचे सर्वेक्षणदेखील करण्यात आले आहे. हे सर्वेक्षण कारशेडसाठी करण्यात आल्याचे ग्रामस्थांचे मत आहे. आता येथील जागेवरच कारशेड उभारण्यासाठी मे महिन्यात एमएमआरडीएकडून निविदा प्रक्रिया राबवली जाणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

यापूर्वी उत्तन येथील सरकारी जमिनीवर कारशेड उभारणे खर्चिक ठरणार असल्याचे मत एमएमआरडीएने सादर केलेल्या अहवालात व्यक्त केले होते. त्यामुळे आता उत्तन येथे कारशेड उभारण्यासाठी येणाऱ्या वाढीव खर्चासंदर्भात राज्य सरकारकडून कोणता निर्णय घेतला जातो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. यामुळे मागच्या काही वर्षांपासून कारशेडविरोधात लढा सुरू ठेवलेल्या राई ग्रामस्थांना मात्र मोठा दिलासा मिळणार आहे.



प्रातिनिधिक छायाचित्र

### आता रस्त्याच्या निर्णयाकडे लक्ष

राई ग्रामस्थांनी कारशेडला विरोध करण्यामागे बाधित होणाऱ्या शेतजमिनी व मेट्रो मार्गिकेच्या कामात बाधित होणारी घरे ही दोन मुख्य कारणे होती. मात्र आता कारशेड उत्तनला स्थलांतरित केली जाणार असल्याने शेतजमिनी बाधित होण्याचा प्रश्न सुटणार आहे. असे असले, तरी मेट्रो मार्गिकेसाठी येथील रस्ता रुंद करणे गरजेचे असल्याचे एमएमआरडीएचे मत आहे. तर दुसरीकडे, गावाबाहेरील पर्यायी रस्त्यावर मेट्रो मार्गिका तयार करावी, अशी ग्रामस्थांची भूमिका आहे. त्यामुळे मेट्रो मार्गिका तयार करण्यासाठी रस्त्यासंदर्भात कोणता निर्णय घेतला जातो, याकडे आता ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

Scanned with CamScanner

पुढारी पु. पा. न. २

## साधना पतपेढी निवडणूक : १३ जागांसाठी २६ उमेदवार रिंगणात!

**वसई :** माजी आमदार डॉमिनिक घोन्सालविस यांच्या पुढाकारातून स्थापन झालेल्या साधना सहकारी पतपेढी ची पंचवार्षिक निवडणूक मंगळवार, दि. ४ एप्रिल २३ रोजी होत आहे. या निवडणुकीमध्ये विद्यमान सत्ताधारी सहकार पॅनलच्या विरोधात युवकांचा मोठ्या प्रमाणात समावेश असलेल्या आदर्श पॅनलने दंड थोपटले आहेत. एकूण १४ जागांसाठी निवडणूक व्हायची होती. मात्र आज निवडणूक अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी आदर्श पॅनलचे अनुसूचित जाती जमाती या वर्गातील उमेदवार विनायक वायडा यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. आता एकूण १३ जागांसाठी २६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. या दोन्ही पॅनलमध्ये चुरशीची लढत होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. सहकार पॅनलसाठी साधना पतपेढीचे विद्यमान चेअरमन अशोक कुलासो आणि अल्बर्ट अधाईत यांनी पुन्हा सत्तेवर येण्यासाठी मोर्चेबांधणी अवलंबली असून, तर त्या विरोधात यंदा साधना पतपेढीमध्ये परिवर्तन घडवायचेच असा चंग बांधून पान मार्केटिंग सोसायटीचे चेअरमन रोहन घोन्सालवीस आणि बॅसिन कॅथोलिक बँकेचे माजी चेअरमन सचिन परेरा यांनी आदर्श पॅनेलद्वारे मोठे आव्हान उभे केले आहे. ९ सर्वसाधारण जागेसाठी १८ उमेदवार, २ महिला राखीव जागेसाठी ४ उमेदवार, १ विशेष मागास प्रवर्गासाठी २ उमेदवार, तसेच १ नागरिकांचा मागास प्रवर्ग वर्गासाठी २ उमेदवार रिंगणमध्ये आहेत. आदर्श पॅनेलचे अनुसूचित जाती जमाती या वर्गातील उमेदवार विनायक वायडा यांची आज बिनविरोध निवड निश्चित झाल्यामुळे आदर्श पॅनेलने विजयाकडे घोडदौड सुरू केल्याचे चित्र आहे. सहकार पॅनल मधील सर्व उमेदवार १० ते २० वर्ष सत्ता उपभोगत आहेत. आता त्यांनी तरुणांना संधी द्यावी, अशी अपेक्षा आदर्श पॅनलचे रोहन घोन्सालविस यांनी या निमित्ताने व्यक्त केली आहे.

सकाळ पु. पा. न. ४

## भाईंदरमध्ये मोफत कायदा सल्ला केंद्र

भाईंदर (बातमीदार) : युथ सोशल वेल्फेअर असोसिएशन (युथ फोरम) या सामाजिक व सांस्कृतिक संस्थेतर्फे मोफत कायदेविषयक सल्ला केंद्र सुरू करण्यात आले आहे. भाईंदर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक एम. बी. पाटील आणि भरोसा सेलच्या पोलिस निरीक्षक तेजश्री शिंदे यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले. या सल्ला केंद्रात दर शनिवारी तज्ज्ञ वकिलांकडून सेवा पुरविल्या जाणार आहेत. त्यासाठी वेळ घेणे बंधनकारक आहे. या प्रसंगी ॲड. अनिल शर्मा, सी. बी. शुक्ला, मोईसे शेख, तरुण शर्मा, सुमिता चिल्वेरी, सुरज नांदोला, राकेश अग्रवाल, दिनेश सराफ, पिंकी सत्संगी, राहुल यादव, गौरांग कंसारा, नरेश नीळे आदी उपस्थित होते.

पुढारी पु. पा. नं. ४

## नालासोपाऱ्यात २५ लाखांचे एमडी जप्त

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

तुळींज पोलीस ठाणे हद्दीत एका इसम हा एम. डी. (मॅफड्रॉन) हा अंमली पदार्थ विक्रीसाठी घेऊन आला असताना अमली पदार्थ विरोधी कक्षाने कारवाई करून त्या इसमाला अटक केली आहे. त्याच्याकडून १२६ ग्रॅम वजनाचा २५,२०,००० रू किंमतीचा अमली पदार्थ जप्त केला आहे.

नालासोपारा परिसरात अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणाऱ्या इसमांविरुद्ध कारवाई करण्याबाबत वरीष्ठांनी आदेश दिले होते. त्यानुसार अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक अमर मराठे यांनी पोलीस पथकासह नालासोपारा परीसरात रवाना होवुन गस्ती घालत असताना नालासोपारा पूर्वेच्या सेंट्रल पार्क येथील श्रीगणेश अपार्टमेंट जवळ एक इसम त्याच्या हातात प्लॅस्टीकची पिशवी घेत-लेली असताना मिळुन आला. त्यावेळी त्याची हालचाल संशयास्पद वाटत असल्याने त्यास ताब्यात घेवून त्याची चौकशी केली असता गितेश अनंत प्रभु रा. टिटवाळा त्याचे नाव असल्याचे समजते. त्याची झडती घेतली असता त्याच्याजवळ १२६ ग्रॅम वजनाचा २५,२०,००० रु. किंमतीचा मॅफड्रॉन हा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी घेऊन आलेला असताना मिळुन आला.

लोकसत्ता पु. पा. न. ५

## वसई, विरार शहरात अनधिकृत आठवडा बाजारांचा सुळसुळाट

### पालिकेच्या दप्तरी केवळ चार बाजारांना परवानगी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई, विरार, शहरात ठिकठिकाणी दैनंदिन आणि आठवडा बाजार भरविण्यात येत असून एवढ्या मोठ्या प्रमाणात बाजार सुरू असताना पालिकेच्या दप्तरी केवळ ४ आठवडा आणि २४ दैनंदिन बाजारांना परवानगी असल्याचे समोर आले आहे. या बाजारांचे सर्वेक्षण करून त्यांना कर लावण्यात येणार असल्याचे पालिकेने सांगितले.

वसई, विरार शहरातील मुख्य रस्त्यावर जागा अडवून आठवडी आणि दैनंदिन बाजार भरविले जात आहेत. करोना काळानंतर शहरातील फेरीवाले वाढले आणि आठवडा बाजारांचे पेव फुटले. फेरीवाला माफियांकडून शहरात ठिकठिकाणी बाजार भरविण्यात येत आहे. शहरात केवळ ४ आठवडी आणि २४ दैनंदिन बाजारांना परवानगी आहे. पालिकेने दिलेल्या माहितीनुसार प्रभाग समिती 'एफ' (धानीव) येथे एक प्रभाग समिती 'जी' (वालीव) मध्ये १, आणि प्रभाग समिती आय (वसई) मध्ये २ बाजार भरविले जात असल्याची माहिती पालिकेने दिली आहे.

शहरात फेरीवाला माफिया या फेरीवाल्यांना बसवून त्यांच्याकडून प्रतिदिन लाखो रुपयांची वसुली करत असतात. त्यामध्ये काही माजी नगरसेवकांचाही समावेश आहे. निर्माण होणाऱ्या समस्यांकडे पालिका हेतुपुरस्सर दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला. जे बाजार रस्त्यात नसतील आणि नागरिकांना त्रास होणार नसेल अशा बाजारांना कर लावण्यात येईल, अशी माहिती आयुक्त अनिलकुमार पवार यांनी दिली.

CamScanner
Scanned with CamScanner

पुढारी पा. न. ५

# ब्लॅकस्पॉट फलक लावून देखील अपघातांचे सत्र सुरूच

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमिरा वाहतूक शाखेच्या हद्दीतील राष्ट्रीय महामार्गावर वाहनांमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून शहरात अपघात होणाऱ्या ५ मुख्य ठिकाणी वाहन चालकांना दुरूनच ब्लॅक स्पॉट दिसावेत यासाठी फलक लावण्यात आले होते. परंतु ब्लॅक स्पॉट फलक लावून देखील अपघातांचे सत्र सुरूच असल्याचे दिसून येत आहे. वाहतूक पोलीस सिग्नलवर दिसत नसल्यामुळे वाहनचालक वाहने अधिक वेगाने चालवत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे सांगितले जाते.

मीरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये १६ ब्लॅक स्पॉट असून त्या सर्व ठिकाणी वाहन चालकांना दिसतील अशा प्रकारचे फलक लावण्यात आले आहेत. मीरा भाईंदर शहरात दिल्ली दरबार, सगनाई नाका, सिल्व्हरपार्क, हाटकेश या ठिकाणी ब्लॅक स्पॉट बोर्ड लावण्यात आले आहेत. वाहनचालकांना लांबवरूनच ब्लॅक स्पॉट हद्द (अपघात क्षेत्र) असल्याचे दिसावे व ब्लॅक स्पॉट हद्द संपल्यानंतर ब्लॅक स्पॉट हद्द समाप्त झालेली आहे, असे फलक ५०० मीटरवर लावण्यात आले आहेत. यामध्ये काही ठिकाणी अपघाताच्या संख्येत घट झाली आहे. परंतु सगणाई नाका येथे होणाऱ्या वाहन अपघाताच्या संख्येत घट झाल्याचे दिसून येत नाही. अनेक वेळा मुख्य रस्ता सोडून सर्व्हिस रोडने जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांवर कारवाई करताना दिसून येतात. यामुळे हायवेला वाहतूक पोलीस उपस्थित नसल्याने वाहन चालक भरधाव वेगाने वाहने चालवत आहेत. त्यामुळे, या ठिकाणी अपघाताची मालिका सुरूच असल्याचे दिसून येते.

### अपघाताचे सत्र केव्हा थांबणार?

दोन महिन्यांपूर्वी याच सिग्नलवर माजी मंत्री दीपक सावंत यांचा अपघात झाला होता. तरीही तेथे सुधारणा होताना दिसत नाही. त्या ठिकाणी अपघात घडून अनेकांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. हे अपघाताचे सत्र कधी थांबणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या अपघाताकडे पोलीस आयुक्त व वाहतूक पोलीस उपायुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी याकडे लक्ष घालावे व मुख्य रस्ता सोडून सर्व्हिस रोडला उभे राहून कर्तव्य बजावणाऱ्या सर्व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी सामाजिक संस्थांकडून करण्यात येत आहे.

सकाळ पा. न. २

# वर्सोवा नवीन खाडी पुलाची एक मार्गिका खुली

भाईंदर, ता. २७ (बातमीदार) : मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वर्सोवा येथे वसई खाडीवर बांधण्यात आलेल्या नव्या पुलाची एक मार्गिका सोमवारी (ता. २७) सायंकाळपासून वाहनांसाठी खुली करण्यात आली आहे. त्यामुळे मुंबई व ठाण्याहून सुरतच्या दिशेने जाणारी वाहने या पुलावरून आता जाऊ शकणार आहेत. पुलाच्या दुसऱ्या मार्गिकेचे काम पूर्ण होण्यासाठी वर्सोवा नाक्यावरील वाहतुकीचा ताण कमी होणे आवश्यक असल्यामुळे ही मार्गिका खुली करण्यात आली आहे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पुलाची एक मार्गिका खुली झाल्याबद्दल ट्विट करून माहिती दिली आहे.

वसई खाडीवरील वर्सोवा येथील जुना पूल कमकुवत झाल्यामुळे खाडीवर नवीन पूल बांधण्याचे काम सुरू करण्यात आले होते. सुरुवातीला विविध प्रकारच्या परवानग्या मिळण्यासाठी लागलेला वेळ व नंतर कोरोनामुळे पुलाचे काम रखडले होते; मात्र आता ते जवळपास पूर्ण होत आले आहे. त्यामुळे पुलाची मुंबई ते सुरत तसेच ठाणे ते सुरत ही मार्गिका सोमवारी सायंकाळी ७ वाजल्यापासून वाहनांसाठी खुली करण्यात आली. त्यामुळे वर्सोवा नाक्यावरील कोंडीतून चालकांना दिलासा मिळणार आहे.

दुसऱ्या मार्गिकेचे अहोरात्र काम करून ते पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात येईल व नवीन पूल वाहतुकीसाठी पूर्णपणे खुला करण्याचा प्राधिकरणाचा प्रयत्न आहे, अशी माहिती प्राधिकरणाचे प्रकल्प महाव्यवस्थापक मुकुंद अतरदे यांनी दिली.

लोकसत्ता पु. पा. न. ४

# नालासोपारा शहरात अमली पदार्थांची तस्करी

## महिनाभरात एक कोटीचे अमली पदार्थ जप्त

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई :** नालासोपारा शहरात अमली पदार्थांच्या विक्रीचे प्रकार वाढू लागले आहेत. मागील महिनाभरात स्थानिक पोलीस आणि गुन्हे शाखेने एक कोटी रुपयांहून अधिक अमली पदार्थ जप्त केले आहेत. तर, रविवारी दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये दोन नायजेरियन नागरिकांसह तिघांना अटक करण्यात आली आहे.

नालासोपारा हे अमली पदार्थ खरेदी व विक्रीचे केंद्र बनले आहे. तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीत १,२०० नायजेरियन नागरिक राहत असून, त्यांचा या अमली पदार्थांच्या व्यवहारात सहभाग आहे. तुळींज पोलिसांनी मागील महिन्यात सात वेगवेगळ्या प्रकरणांत कारवाया करून एक कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले आहे. तर, रविवारी प्रगतीनगर येथे दोन नायजेरियन नागरिकांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडे ५२ ग्रॅम एमडी, १३ ग्रॅम कोकेन आणि १५० ग्रॅम गांजा मिळाला होता. त्याची किंमत पावणेसात लाख रुपये आहे. गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी कक्षाने सेंट्रल पार्क येथे गितेश प्रभु (४४) याला अटक केली. त्याच्याकडून १२६ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले असून त्याची किंमत २५ लाख रुपये आहे.

अमली पदार्थांच्या विरोधातील कारवाया आम्ही तीव्र केल्या आहेत. मागील महिन्यात सात ठिकाणी कारवाया करून एक कोटीहून अधिक किमतीचे अमली पदार्थ जप्त केले आहेत, अशी माहिती तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी दिली.

CamScanner

Scanned with CamScanner

लोकसत्ता पु. पा. नं. ४

# वाळू उपशामुळे समुद्र किनाऱ्यांची धूप

## नवापूर किनाऱ्यावर उपसा; प्रशासनाचे दुर्लक्ष

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** वसई-विरारमध्ये पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या समुद्रकिनाऱ्यांवर छुप्या मार्गाने वाळू उपसा होऊ लागला आहे. या वाळू उपशाचा फटका समुद्रकिनाऱ्यांना बसत असून पर्यावरणासह पर्यटन धोक्यात आले आहे.

वसई-विरार शहरांत अर्नाळा, नवापूर, भुईगाव, सुरुची, राजोडी, असे समुद्रकिनारे असून, ते पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत. सध्या या किनाऱ्यांवर बेकायदा वाळू उपसा होत असल्याचे प्रकार समोर येऊ लागले आहेत. वसई पश्चिमेतील नवापूर समुद्रकिनारी नुकताच असा प्रकार उघडकीस आला होता. सातत्याने येथून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होत असून, वाळू गोण्यांमध्ये भरून विकण्याचे प्रकार सुरू आहेत. मात्र, त्याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

बहुतांश समुद्रकिनाऱ्यावर रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत वाळूमाफियांकडून हा उपसा केला जात आहे, तर काही ठिकाणी भरदिवसा वाळू उपसा केला जात आहे. मागील काही दिवसांपासून सतत नवापूर समुद्रकिनारपट्टीच्या भागात वाळू उत्खनन करण्याचे काम सुरू असल्याचे आम आदमी पार्टीचे जॉन परेरा यांनी सांगितले. वाळू उपशामुळे समुद्रकिनाऱ्यांची धूप होऊन किनारे खचू लागले आहेत. त्यामुळे पर्यटक बुडण्याच्या घटना, घरांचा पाया खचण्याच्या घटना घडत आहेत.



> किनाऱ्यावरील वाळू उपसा होत असल्याबाबत तक्रार मिळाली आहे. वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.
>
> – कल्याणराव कर्पे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अर्नाळा सागरी पोलीस ठाणे

> समुद्रकिनाऱ्यांवर जेथे वाळू उपसा होत आहे, अशा ठिकाणी लक्ष ठेवून कारवाई केली जाईल.
>
> – उज्ज्वला भगत, तहसीलदार, वसई

### किनाऱ्यावरील झाडेही धोक्यात

समुद्रकिनाऱ्यांवर सुरू, नारळ व इतर झाडे आहेत. वाळू उपसा होत असल्याने या झाडांच्या मुळाशी असलेली सर्व वाळू निसटून जात आहे. त्यामुळे झाडांची पकड कमी होऊन ती कोसळण्याच्या मार्गावर आहेत. तर, दुसरीकडे या प्रकारामुळे पावसाळ्यातही मोठ्या प्रमाणात झाडे उन्मळून पडण्याचे प्रमाण अधिक आहे. वाळू उपसा रोखल्यास किनाऱ्यावर असलेली निसर्गसंपदेचे संवर्धन होण्यास मदत होणार आहे.

### वाळू वाहतुकीसाठी गोण्यांचा वापर

वाळू उपसा करण्यासाठी आता वाळूमाफियांनी अनोखी शक्कल लढविली आहे. वाळू असल्याचे निदर्शनास येऊ नये, म्हणून सिमेंटच्या गोण्यांचा वापर केला जात आहे. या गोण्यांमध्ये वाळू भरून त्याची वाहतूक सुरू केली आहे.

लोकसत्ता पु. पा. नं. ४

## सामाजिक संस्था, नागरिकांसोबत बैठका

# नायगाव पोलिसांचा जनसंवादावर भर

लोकसत्ता वार्ताहर

**वसई :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत नुकतेच नवीन नायगाव पोलीस ठाणे सुरू करण्यात आले आहे. कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी व नागरिकांच्या समस्यांही पोलिसांच्या समोर याव्यात, यासाठी नायगाव पोलिसांनी बैठका घेऊन जनसंवाद सुरू केला आहे.

नायगाव पूर्वेच्या साई एनक्लेव्ह या इमारतीत नायगाव पोलीस ठाणे सुरू करण्यात आले आहे. या पोलीस ठाण्याच्या हद्दीत जूचंद्र, चंद्रपाडा, बापाने, कोल्ही, चिंचोटी, कामण, पोमण, मालजीपाडा, टीवरी, ससूनवघर, नागले, मोरी, सारजामोरी, देवदल, शिलोत्तर या १५ गावांचा समावेश आहे. परंतु या भागाचे नागरीकरण वाढत असून, बहुतांश भाग हा दाटीवाटीचा परिसर आहे. यामुळे तेथील गुन्ह्यांवर लक्ष ठेवणे, कायदा सुव्यवस्था राखणे गरजेचे आहे.

याशिवाय पोलीस व सर्वसामान्य नागरिक यांच्यात आपुलकीची भावना निर्माण व्हावी, यासाठी नायगाव पोलीस ठाण्यातर्फे विविध सामाजिक संस्था, नागरिक यांच्याशी संवाद साधण्याचे काम सुरू केले आहे. नायगाव पोलीस ठाण्यात नुकतीच शांतता कमिटीची पहिली बैठक वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे यांनी घेतली. या वेळी कायदा सुव्यवस्था, पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व महत्त्वपूर्ण बाबींचा आढावा घेण्यात आला.

### महिलांच्या सुरक्षिततेसाठी नियोजन

महिलांवरील अत्याचाराच्या घटना, फसवणुकीच्या घटना यासह इतर घटना रोखण्यासाठी नायगाव पोलीस ठाण्याच्या अंतर्गत विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. महिला दक्षता कमिटीची नुकतीच बैठक घेण्यात आली आहे. महिलांमध्ये जनजागृती व्हावी, याच उद्देशाने यापुढे मार्गदर्शनपर व्याख्याने आणि बैठका घेतल्या जाणार आहेत.

CamScanner
Scanned with CamScanner

सकाळ पु. पा. क्र. ४

दर्गा, हनुमान पुतळा आणि ख्रिश्चनांचा क्रॉस एकाच ठिकाणी

# वसईतील पोशापिर बेटातून एकात्मतेचे दर्शन

विजय गायकवाड : सकाळ वृत्तसेवा

नालासोपारा, ता. २७ : माहीम येथील दर्ग्याबाबत मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्या ठिकाणी तातडीने कारवाई करण्यात आली. अशातच वसईजवळ समुद्रातील नैसर्गिक बेटावर असलेले पोशापिर हे बेटही चर्चेत आले आहे. या बेटावर मुस्लिमांचा दर्गा, हिंदू धर्मियांच्या हनुमानाचा पुतळा आणि ख्रिश्चनांचा क्रॉस एकाच ठिकाणी असल्याने सर्वधर्म सहिष्णुतेचे प्रतीक ठरत आहे.

वसई किल्लाबंदर कस्टम जेटीपासून सुमारे दोन नॉटिकल मैल अंतरावर पोशापिर हे निर्मनुष्य बेट आहे. या बेटाचे अंदाजे क्षेत्रफळ १५,७५० चौरस मीटर असून या ठिकाणी मुस्लिमांचा दर्गा, हिंदू धर्मियांच्या हनुमानाचा पूर्ण पुतळा आणि ख्रिश्चन धर्मियांचा क्रॉस एकत्र आहे.

पोशापिर बेट येथे हजरत सय्यद पीर गौश आली शहा कादरी, गोशापिर बावा (पोशापिर) यांचा दर्गा आहे.

या दर्ग्यात मस्जिद-ए-कादरी असे दिवा लावण्याकरिता पक्के बांधकाम केलेले असून, त्याची १५ फूट लांब अशी भिंत आहे. याच बेटाच्या टेकडीवर १ मे २०१६ पासून पवनपुत्र हनुमान पूर्ण पुतळा आहे; तर बाजूला ख्रिश्चन धर्मियांचे क्रॉसचे पक्के बांधकाम केलेले आहे. तसेच त्याच ठिकाणी युनियन ऑफ टेरोटरी असे इंग्रजीमध्ये लिहिलेला चौथारा आहे. तेथे एक मेरिटाईम बोर्डाने लाईट हाऊस बसवलेले आहे.


पोशापिर बेटावर भाईंदर, उत्तन, वसई, अर्नाळा तसेच आसपासच्या परिसरातील हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन धर्मीय लोक बोटीने येतात आणि रीतिरिवाजाप्रमाणे धार्मिक विधी करून गुण्यागोविंदाने राहतात.

> माझ्या जन्मापूर्वीपासूनचे वसईच्या समुद्रातील हे बेट आहे. या बेटावर दर्गा, हनुमान पुतळा आणि ख्रिश्चन धर्मियांचा क्रॉस आजूबाजूलाच आहे, पण आजपर्यंत कुणाची तक्रार असल्याचे आम्ही ऐकले नाही.
>
> **- सचिन अलमेडा**, रानगाव, स्थानिक रहिवासी

> राज ठाकरेंच्या सभेनंतर माहीमसह आणि राज्यातील दर्ग्याचा विषय समोर आला, पण वसईच्या पोशापिर बेटावर तीन धर्मांचे प्रतीक आहे.
>
> **- गणेश शिंदे**, स्थानिक रहिवासी, वसई

## खोल समुद्रात असल्याने वावर कमी

पोशापिर हे बेट नैसर्गिक असून, या बेटावर अंदाजे १० ते १५ वर्षापूर्वीपासून दर्गा, हनुमानाचा पूर्ण पुतळा आणि ख्रिश्चन धर्मियांचे क्रॉसचे प्रतीक बसवले असल्याचे सांगण्यात येत आहे; मात्र याची अधिकृत माहिती कुणालाही सांगता येत नाही. पोशापिर बेट हे खोल समुद्रात असल्याने तिकडे नेहमी नागरिकांना जाता येत नाही. भरती-ओहोटी याचा अंदाज घेऊन नागरिक त्या ठिकाणी जातात.



नालासोपारा : पोशापिर बेटावर दर्गा, हनुमानाचा पुतळा आणि ख्रिश्चनांचा क्रॉस एकाच ठिकाणी आहे.

Scanned with CamScanner

दैनिक
# मुंबई केसरी टाइम्स
R.N.I. NO MAHHIN/2008/25162
एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई.
www.mumbaikesaritimes.com
वर्ष : १५ अंक : 289 मंगलवार २८ मार्च २०२३ मूल्य 2 रुपया Post-Reg- No. PLG/249/2023/2025 पृष्ठ : 08

# ३१ लाख से अधिक का मादक प्रदार्थ के साथ ३ आरोपी गिरफ्तार, दो नाईजीरियन शामिल

**वसई :** इन दिनों एमबीवीवी पुलिस आयुक्तालय क्षेत्र में मादक पदार्थो पर एमबीवीवी पुलिस द्वारा तावड़तोड़ कार्रवाई कर रही है. मार्च २०२३ में नालासोपारा पूर्व से पुलिस ने करोड़ों रुपये का ड्रग्स बरामद कर चुकी है। दिनांक २५ व २७ मार्च को तुलिंज पुलिस व एंटी नारकोटिक्स सेल ने नालासोपारा से भारी मात्रा ड्रग्स बरामद किया है. जिसमे २ नाईजीरियन आरोपी शामिल है। यह कार्रवाई क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे. परिमंडल ३ डीसीपी सुहास बावचे व एसीपी (क्राइम) अमोल मांडवे. एसीपी चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन में एंटी नारकोटिक्स सेल के पी.आई अमर मराठे व तुलिंज थाने के सीनियर पी.आई शैलेन्द्र नगरकर के नेतृत्व में पुलिस अधिकारी-कर्मचारी ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने सोमवार को दी है। बातदे




कि, जबसे नए एमबीवीवी पुलिस कमिश्नर की कमान मधुकर पांडेय संभाले है तबसे शहर में ड्रग्स तस्करों में हड़कंप मच गया है. दरअसल एमबीवीवी पुलिस लगातार ड्रग्स माफियाओं में शिकंजा कस रही है व आए दिन भारी मात्रा में ड्रग्स जप्त कर रही है। इसी क्रम में नालासोपारा पूर्व के तुलिंज पुलिस की क्राइम डिटेक्शन टीम के पुलिस कर्मचारी २७ मार्च को प्रात:४ : ३० बजे के आसपास गस्त कर रही थी. तभी गुप्त सूचना मिली कि नालासोपारा पूर्व के प्रगति नगर क्षेत्र में दो नाईजीरियन ड्रग्स बेच रहे है. सूचना के आधार पर क्राइम डिटेक्शन के पुलिस अधिकारी-कर्मचारी ने उक्त स्थान पर जाल बिछाया व दो नाईजीरियन को धर दबोचा. पुलिस के मुताबिक. येवो हमीद रेमंड (३९) व येझे माइकल चुकुमा (३३) के पास गांजा. एम.डी व कोकीन ड्रग्स जप्त किया. पुलिस ने कहा कि कुलमिलाकर ६.५१.७०० रुपये का माल जप्त किया गया है। इसी क्रम में एंटी नारकोटिक्स सेल ( मीरा-भाईदर. वसई-विरार पुलिस आयुक्तालय ) ने नालासोपारा पूर्व के सेंट्रल पार्क स्थित २५ मार्च को मादक प्रदार्थो की तस्करी करने वाले एक शख्स पर कार्रवाई की है। पुलिस ने बताया कि एंटी नारकोटिक्स सेल की टीम ने उक्त स्थान से आरोपी गितेश अनंत प्रभु, निवासी-टिटवाला (पुर्व) को हिरासत में लिया व उसके पास से १२६ ग्राम वजन (कीमत २५.२०.००० रुपये) मॅफेड्रॉन ड्रग्स जप्त किया है। फिलहाल, पुलिस ने नालासोपारा पूर्व क्षेत्र से कुलमिलाकर ३१.७१.७०० रुपये का मादक प्रदार्थ जप्त किया है। हालॉकि. उक्त तीनों आरोपियों के खिलाफ तुलिंज थाने में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है।

Scanned with CamScanner

लोकमत

# चालक, पोलिस शिपाई भरती लेखी परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** चालक व पोलिस शिपाई भरती लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या १०४ उमेदवारांपैकी परीक्षेसाठी ९९ उमेदवारांनी मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या कार्यालयामध्ये रविवारी सकाळी परीक्षा दिली.

लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र हे महाआयटी विभागामार्फत ऑनलाइन पद्धतीने डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध होते. पोलिस शिपाई-चालक लेखी परीक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांना रविवारी सकाळी साडेसहा वाजता परीक्षेसाठी हजर राहण्यास सांगण्यात आले होते. आयुक्तालयाकडून पाण्याची बॉटल व बिस्किटचा पुडा देण्यात आला होता. आयुक्तलयामार्फत पोलिस शिपाई व चालक भरती लेखी परीक्षा पारदर्शकपणे पार पाडण्याकरिता सर्व स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात आल्या होत्या.

पोलिस आयुक्तालयांतर्गत सुरू असलेल्या पोलिस शिपाई व चालक पदाच्या प्रक्रियेमध्ये शारीरिक चाचणी व कौशल्य चाचणीमधून लेखी परीक्षेसाठी १२ हजार १२४ उमेदवार पोलिस शिपाई लेखीसाठी पात्र असून १०४ उमेदवार चालक पोलिस शिपाई लेखी परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. पात्र उमेदवारांनी लेखी परीक्षेकरिता येताना कोणत्या गोष्टी सोबत घेऊन याव्यात व कोणत्या गोष्टी परीक्षेच्या वेळी सोबत बाळगता येणार नाहीत. याबाबत उमेदवारांना माहिती देण्यात आली होती.

उमेदवारांनी वेळेवर परीक्षेच्या ठिकाणी हजर राहणे बंधनकारक होते. उमेदवारांना पॅड व काळ्या शाईचे पेन परीक्षेवेळी कार्यालयाकडून पुरवण्यात आले होते. त्यामुळे कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कोणतेही साहित्य परीक्षा केंद्रावर आणण्यास मनाई होती. परीक्षेदरम्यान उमेदवारांनी मोबाईल, स्मार्ट वॉच, गणक यंत्र इतर कोणतेही ब्लूटूथ यंत्र जवळ बाळगण्यास सक्त मनाई करण्यात आली होती.

तसे निदर्शनास आल्यास अथवा उमेदवार परीक्षेदरम्यान इतर कोणत्याही बेकायदेशीर मार्गाचा वापर करत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल व संबंधित उमेदवारास पुढील पोलिस भरती प्रक्रियेतून तत्काळ बाद केले जाणार आहे.



Scanned with CamScanner

लोकमत

# आय विटनेस चालक, पोलिस शिपाई भरतीचे 'लेखी आव्हान'!



नालासोपारा : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या कार्यालयामध्ये रविवारी सकाळी साडेआठ ते दहा वाजण्याच्या वेळेत चालक तसेच पोलिस शिपाई भरतीसाठी लेखी परीक्षा घेण्यात आली.

यावेळी चालक आणि पोलिस शिपाई भरतीसाठीच्या लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या १०४ उमेदवारांपैकी परीक्षेसाठी ९१ उमेदवार हजर होते. विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

लेखी परीक्षा ही व्हेरिफिकेशन, बायोमेट्रिक, फ्रीस्किंग, सीसीटीव्ही, व्हिडीओग्राफी, उचित बंदोबस्तासह पारदर्शकपणे घेण्यात आल्याची माहिती यावेळी पोलिस आयुक्तालयामार्फत देण्यात आली आहे. (छाया : मंगेश कराळे)

Hello Vasai
Page No. 1 Mar 28, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# रेतीचोरांवर कारवाई

नालासोपारा : वैतरणा खाडीकिनारी दहा ब्रास रेती जप्त करण्यात मांडवी पोलिसांना यश आले आहे. वैतरणा खाडीकिनारी रेल्वे पुलाच्या परिसरात अवैधरीत्या रेती उत्खननास कायद्याने बंदी असताना रेल्वे पूल क्र.१२ जवळ शनिवारी संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास आरोपी सागर ज्ञानेश्वर पाटील व राकेश मेहेर यांनी ५० हजार रुपये किमतीची दहा ब्रास रेती अवैधरीत्या उत्खनन व विक्रीसाठी साठा करून ठेवली होती. मांडवी पोलिसांनी कारवाई करून दोन जणांविरुद्ध रविवारी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

Mumbai Main
Page No. 4 Mar 28, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# फिर मिली नालासोपारा में ड्रग्स की बड़ी खेप, दो नाईजीरियन समेत 3 गिरफ्तार

दबंग रिपोर्टर » वसई

इन दिनों एमबीवीवी पुलिस आयुक्तालय क्षेत्र में मादक पदार्थों पर एमबीवीवी पुलिस द्वारा ताबड़तोड़ कार्रवाई कर रही है। मार्च 2023 में नालासोपारा पूर्व से पुलिस ने करोड़ों रुपये का ड्रग्स बरामद कर चुकी है। दिनांक 25 व 27 मार्च को तुलिंज पुलिस व एंटी नारकोटिक्स सेल ने नालासोपारा से भारी मात्रा ड्रग्स बरामद किया है, जिसमे 2 नाईजीरियन आरोपी शामिल है। यह कार्रवाई क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे,परिमंडल 3 डीसीपी सुहास बावचे व एसीपी (क्राइम) अमोल मांडवे, एसीपी चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन में एंटी नारकोटिक्स सेल के पी.आई अमर मराठे व तुलिंज थाने के सीनियर पी.आई शैलेन्द्र नगरकर के नेतृत्व में पुलिस अधिकारी-कर्मचारी ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने सोमवार को दी है। बता दें कि जबसे नए एमबीवीवी पुलिस कमिश्नर की कमान मधुकर पांडेय संभाले है तबसे शहर में ड्रग्स तस्करों में हड़कंप मच गया है, दरअसल एमबीवीवी पुलिस लगातार ड्रग्स माफियाओं में शिकंजा कस रही है व आए दिन भारी मात्रा में ड्रग्स जप्त कर रही है। इसी क्रम में नालासोपारा पूर्व के तुलिंज पुलिस की क्राइम डिटेक्शन टीम के पुलिस कर्मचारी 27 मार्च को प्रातः 4.30 बजे के आसपास गस्त कर रही थी। तभी गुप्त सूचना मिली कि नालासोपारा पूर्व के प्रगति नगर क्षेत्र में दो नाईजीरियन ड्रग्स बेच रहे हैं। सूचना के आधार पर क्राइम डिटेक्शन के पुलिस अधिकारी-कर्मचारी ने उक्त स्थान पर जाल बिछाया व दो नाईजीरियन को धर दबोचा,पुलिस के मुताबिक,येवो हमीद रेमंड (39) व येझे माइकल चुकुमा (33) के पास गांजा,एम.डी व कोकीन ड्रग्स जप्त किया,पुलिस ने कहा कि कुलमिलाकर 6,51,700 रुपये का माल जप्त किया गया है। इसी क्रम में एंटी नारकोटिक्स सेल ( मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय ) ने नालासोपारा पूर्व के सेंट्रल पार्क स्थित 25 मार्च को मादक प्रदार्थों की तस्करी करने वाले एक शख्स पर कार्रवाई की है। पुलिस ने बताया कि एंटी नारकोटिक्स सेल की टीम ने उक्त स्थान से आरोपी गितेश अनंत प्रभु,निवासी- टिटवाला (पुर्व) को हिरासत में लिया व उसके पास से 126 ग्राम वजन (कीमत 25,20,000 रुपये ) मॅफिड्रॉन ड्रग्स जप्त किया है। फिलहाल, पुलिस ने नालासोपारा पूर्व क्षेत्र से कुलमिलाकर 31,71,700 रुपये का मादक प्रदार्थ जप्त किया है। हालांकि,उक्त तीनों आरोपियों के खिलाफ तुलिंज थाने में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है।






Scanned with CamScanner